RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १०, अंक २०] शुक्रवार, मार्च १५, २०२४/फाल्गुन २५, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक २८

प्राधिकृत प्रकाशन

### शहर औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम २६(१) प्रारूप विकास आराखड्याची प्रसिद्धी करण्याकरिता**

**क्रमांक सिडको/नियोजन/बीएन-१२६८०**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (महा. XXXVII) १९६६ चा (या पुढे 'उक्त अधिनियम' असे संबोधिलेले) च्या कलम ११३, उप कलम (३क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाचे नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाच्या दिनांक २० मार्च १९७१ रोजीचे अधिसूचना क्र. आरपीबी ११७१/१८१२४/११३/११-डब्ल्यू आणि दिनांक १६ ऑगस्ट १९७३ रोजीची अधिसूचना क्र. आरपीबी/११७३-आरपीसी द्वारे 'नवी मुंबई' प्रकल्पाच्या अधिसूचित क्षेत्राकरिता 'शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित' ला (महाराष्ट्र शासनाची स्वमालकीची आणि नियंत्रत कंपनी, यापुढे 'महामंडळ' म्हणून निर्देशित केलेले) 'नवीन शहर विकास प्राधिकरण' म्हणून घोषित केले ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास, सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या अधिसूचना क्र. TPS/१२१७/UOR/UOR-१/CR-१०२/१७/UD-१२ च्या अन्वये नमूद केलेल्या उक्त जमिनी उक्त महामंडळाच्या अधिसूचीत क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या आहेत आणि त्या जमिनीसंदर्भात शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे 'नवनगर विकास प्राधिकरण' म्हणून असलेले कार्य संपुष्टात आणण्यात आले आहे; उक्त नियमाच्या कलम ४०(१) (ख) मधील तरतुदीनुसार व त्याअन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारान्वये सदर क्षेत्राकरिता शहर व औद्योगिक विकास महामंडळाची 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नेमणूक करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महामंडळाच्या खाली नमूद अनुसूची मध्ये नमूद उक्त वगळण्यात आलेल्या जमिनीकरिता शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नेमणूक करण्यात आली असून त्याकरिता प्रारूप विकास आराखडा उक्त अधिनियमाच्या कलम २३ मधील तरतुदीनुसार महामंडळाने प्रारूप विकास आराखडा तयार करण्याबाबत इराद्याचा प्रस्ताव दिनांक ५ ऑगस्ट २०२१ रोजीच्या संचालक मंडळाच्या ६३१ च्या बैठकीतील ठराव क्र. १२४४३ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे; त्याअनुषंगाने सदर अधिसूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र,** भाग-दोन, दिनांक १७ सप्टेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर अधिनियमाच्या कलम २४ मधील तरतुदीनुसार नगररचना सहसंचालकांनी विद्यमान जमीन वापर, प्रारूप विकास आराखडा इ. तयार करण्यासाठी वरिष्ठ नियोजनकार (वि.आ.) यांची "नगर नियोजन अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यास दिनांक २३ डिसेंबर २०२१ रोजी मान्यता दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजीच्या आदेश क्रमांक CIDCO/VC&MD/२०२२/२४८ द्वारे उक्त क्षेत्रासाठी हा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यासाठी वरिष्ठ नियोजक (DP) यांची "नगर नियोजन अधिकारी" म्हणून नियुक्ती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, नगररचना अधिकाऱ्याने उक्त अधिनियमाच्या कलम २५ नुसार विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, १९ ऑक्टोबर २०२२ रोजी महाराष्ट्र शासनास कळविलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये उक्त मसुदा विकास आराखडा प्रकाशित करण्यासाठी, लोकांकडून सूचना/आक्षेप मागवण्यासाठी, सदर सिडको महामंडळाच्या संचालक मंडळाने ठराव क्रमांक १२८६०, दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ ऑफ महाराष्ट्र लि. याद्वारे जनतेकडून सूचना/हरकती मागवण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये अहवालासह सदर प्रारूप विकास आराखडा प्रकाशित करत आहे. सदर मसुदा प्रारूप विकास आराखड्याची प्रत आणि त्याचा अहवाल खालील कार्यालयात सर्व कामकाजाच्या दिवसांत कार्यालयीन वेळेत जनतेच्या तपासणीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

१. सिडको महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय, दुसरा मजला, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१.

२. मुख्य नियोजनकार, नियोजन विभाग, ४था मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

३. सहसंचालक, नगररचना कार्यालय, कोकण भवन, CBD बेलापूर, नवी मुंबई.

त्याअर्थी, या संदर्भात लोकांकडून काही सूचना/हरकती असल्यास, कारणांसह लिखित स्वरूपात, वरिष्ठ नियोजनकार (वि.आ.)/नगर नियोजन अधिकारी (SPA) यांच्याकडे सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पाठविण्यात याव्यात. सदरची सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नगररचना अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील. सदर मसुदा विकास आराखड्याच्या प्रती आणि तपशील लोकांना वाजवी किमतीत वरिष्ठ नियोजक (DP)/नगर नियोजन अधिकारी (SPA), सिडको भवन, चौथा मजला, CBD बेलापूर, नवी मुंबई येथे उपलब्ध असतील.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

**जगदीश भास्कर पाटील,**
नगररचना अधिकारी.

**नोंदणीकृत कार्यालय :** दुसरा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
दिनांक १५ मार्च २०२४.

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED

### Notice

### Publication of Draft Development Plan of Special Planning Authority Under Section 26(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

No. CIDCO/Planning/BN-12680

Whereas, the Government of Maharashtra in exercise of the powers conferred by sub-section (*3a*) of the section 113 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification by Urban Development, Public Health and Housing Department No. RPB 1171/18124/113/II- W, dated 20th March 1971, and No. RPB / 1173-II-RPC, dated the 16th August 1973. declared City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (company owned and controlled by the Government of Maharashtra and hereinafter referred to as "The Corporation") as the New Town Development Authority for the area comprised in the site of Navi Mumbai as specified therein ;

And whereas, The Government of Maharashtra (GoM) Urban Development Department (UDD) *vide* its Notification No. TPS/1217/UOR-1/CR-102/17/UD-12, dated 31st October 2017, denotified some land pockets from the Navi Mumbai New Town Notified area, described in the Schedule of said notification as deleted lands whereby CIDCO ceases to function as the New Town Development Authority (NTDA), and appointed CIDCO as the Special Planning Authority (SPA) u/s 40(*1*)(*b*) of the Maharashtra Regional and Town Planning (MR and TP) Act, 1966 ;

And whereas, the City and Industrial Development Corporation (hereinafter referred to as "the said Planning Authority,") *vide* Resolution No. 12443, dated 5th August 2021 had declared its intention to prepare a Draft Development Plan of Special Planning Authority area of CIDCO Navi Mumbai (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said "area" ) as per the provision of section 23(*1*) read with section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said Act") and notice to that effect is published in *Maharashtra Government Gazette* MAHBIL/2009/35827 Division, Supplement Part 2 on 17th September 2021 ;

And whereas, Jt. Director of Town Planning as per the provision in section 24 of the said Act has given approval for appointment of Senior Planner (DP) as "Town Planning Officer" for preparation of Existing Land Use, Draft Development Plan, etc. for the said area on 23rd December 2021 ;

And whereas, Vice Chairman and Managing Director *vide* Order No. CIDCO/VC&MD/2022/248 dated 11th January 2022 has appointed Senior Planner (DP) as "Town Planning Officer" to prepare the said Draft Development Plan for the said area ;

And whereas, the Town Planning Officer after having prepared Existing Land Use Map as per section 25 of the said Act, informed to GoM on 19th October 2022 ;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 12860, dated 12th February 2024 to publish the said Draft Development Plan under section 26(*1*) of the said Act, for inviting suggestions/objections from the public.

Therefore, City and Industrial Development Corporation of Maharashtra Ltd. hereby publish the said Draft Development Plan alongwith the Report under section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. Registered Office of the Corporation, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021.
2. Office of Chief Planner DP, CIDCO, CBD Belapur, Navi Mumbai.
3. Office of Joint Director of Town Planning, Konkan Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Senior Planner (DP)/ Town Planning Officer (SPA) within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette*. The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Senior Planner (DP)/ Town Planning Officer (SPA), CIDCO Bhavan, 4th Floor, CBD Belapur, Navi Mumbai.

By the order of Board of Directors of the Corporation,

*Regd. Office* : Nirmal, 2nd Floor,
Nariman Point, Mumbai 400 021.
dated 15th March 2024.

JAGADISH BHASKAR PATIL,
Town Planning Officer (SPA).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.